माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

## रामाआ- तक्रार क्र. बीएम- ४१३/२०१९

**तक्रारकर्ता श्री. गोपीनाथ रामा साळवी**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्राध्यापक नि विभाग प्रमुख**
नेफ्रॉलॉजी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, रा.ए.स्मारक रुग्णालय
व सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई -४०० ०१२

**प्रथम अपिलीय अधिकारी**
नेफ्रॉलॉजी विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, रा.ए.स्मारक रुग्णालय
व सेठ गो.सुं.वैद्यकीय महाविद्यालय, परळ, मुंबई -४०० ०१२

## <u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०६.११.२०२४</u>

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २३.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २३.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. मु.मा.आ. नों.क्र. ६५२/२०१८ रा.मा.आ.अपील क्र. १९४/२०१९ प्रकरणी आयोगाने दि. ०५.०७.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-
"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीनी केलेला तक्रार अर्ज दि. ०७.०९.२०१७ वर करण्यात आलेली कारवाई बाबतची माहिती १५ दिवसांत नोंदणीकृत टपालातून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये निशुल्क पुरवावी. अपील निकाली काढण्यात येत आहे."

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. २८.०८.२०१९ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी, रा. ए. स्मारक रुग्णालय (के.ई.एम रुग्णालय), परळ, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि. १६.०९.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी, रा. ए. स्मारक रुग्णालय (के.ई.एम रुग्णालय), परळ, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. ०३.१०.२०१९ आयोगास सादर केला. जन माहिती अधिकारी यांनी अहवालात नमुद केले की, गतवर्षी श्री. किशोर वर्दम यांच्या कामाची दखल घेऊन रुग्णालय प्रशासनाकडून त्यांना "सर्वोत्तम कर्मचारी" हा पुरस्कारही देण्यात आला आहे. श्री. किशोर वर्दम हे त्यांना नेमुन दिलेले काम जबाबदारीने व वेळेवर पार पाडत आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीबाबत अन्य कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

..२/-

तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे दि. ०५.११.२०२४ आयोगास सादर करुन नमुद केले की, त्यांची शस्त्रक्रिया झाल्याने व तब्येत बरी नसल्याने त्यांना सुनावणीस उपस्थित राहता आले नाही. तसेच त्यांनी तक्रारीचे निराकरण करुन योग्य ती कारवाई करण्याची विनंती केली.

जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.१०.२०१९ रोजी आयोगास पाठविलेल्या अहवालाची प्रत तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क पाठवावी.

या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 7-11-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**

**दिनांक : ०७.११.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**